राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत १००० मासंल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरू करणे (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) या योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : राज्ययो-२०२१/प्र.क्र.११/ पदुम-४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.**
**दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०२१.**

वाचा :- १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक : राज्ययो-२०१२/प्र.क्र.१६२/ पदुम-४, दि.१४.०२.२०१३.
२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राज्ययो-२०१२/प्र.क्र.१६२/ पदुम-४, दि.३०.०९.२०१३.
३. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र.७७ (भाग-१)/ पदुम-४, दि.१४.०९.२०२०.
४. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक : बीडीएस-२०२०/प्र.क्र.१३८/पदुम-४, दि.३१.१२.०२०२०.
५. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. कुक्कुट -२/नायो/ प्र.क्र.४/भाग-२/१५८/२०२१ पसं-१३, पुणे, दि.८.०१.२०२१.

**प्रस्तावना :-** राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत १००० मासंल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरू करणे (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) या योजनेस वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

या योजनेसाठी चालू आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत अनुक्रमे रू.१२९२.०० लक्ष व रू.७००.०० निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. वाचा क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी संकेतांक क्र.२४०३बी८८२ अंतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या निधीपैकी वित्त विभागाने निर्देशित केल्यानुसार ३५ टक्के मर्यादेच्या अधिन राहून रू.४५२.२० लक्ष निधी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचेकडे बीडीएसवर वितरित करण्यात आलेला आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत निधी वितरणाचा प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे सादर केलेला असून तो त्या विभागाच्या विचाराधीन आहे.

चालू आर्थिक वर्षात कोव्हिड-१९ मुळे उद्भवलेली महामारी, त्यानुषंगाने लावण्यात आलेली लॉकडाऊनची स्थिती तसेच, अर्थसंकल्पित निधीपैकी उपलब्ध होणारा अल्प निधी पहाता, या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय-

राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत १००० मासंल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरू करणे (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) या राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या वाचा क्र.१ येथील शासन निर्णयातील पृ.क्र.३ येथील योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांमधील मार्गदर्शक सूचना क्र.२ अन्वये लाभार्थ्यांनी अर्ज करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. उक्त विवक्षित स्थीती विचारात घेता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी लाभार्थी निवडण्याच्या अनुषंगाने खालील सूचना समाविष्ट करण्यात येत आहे.

*२ (अ) या योजनेअंतर्गत मागील आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अर्जांमधील वैध व प्रतिक्षाधीन अर्जातून लाभार्थी निवडण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, ज्या जिल्ह्यात लाभार्थी अर्ज संख्या कमी आहे, तेथे गरजेनुसार ऑफलाईन / ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यासाठी किमान सात दिवसांची मुदत देण्यात यावी.*

*ज्या जिल्ह्यांमध्ये मागील वर्षी प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये वैध व प्रतिक्षाधीन अर्ज कमी किंवा उपलब्ध नसतील, अशा जिल्ह्यांमध्ये ऑफलाईन / ऑनालईन पध्दतीने नविन अर्ज मागविण्यास किमान ०७ दिवसांची मुदत देण्यात यावी.*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मा. आ. गुट्टे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
१. मा.मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित)
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)
६. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व संबंधित)
७. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व संबंधित)
८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)
९. महालेखापाल कार्यालय १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), मुंबई / नागपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व संबंधित).
११. निवड नस्ती पदुम-४.